जिल्हा महिला बाल विकास अधिकारी / जिल्हा कार्यक्रम अधिकारी(महिला व बाल विकास), जिल्हा परिषद/सहा. आयुक्त/ बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) व तत्सम पदे गट-अ या संवर्गातील अधिका-यांच्या **पदस्थापनेत अंशत: बदल करणेबाबत - सन २०१९-२०.**

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन आदेश क्रमांक : मबाआ २०१९/प्र.क्र.५३/का.७
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १७ सप्टेंबर, २०१९

वाचा:- महिला व बाल विकास विभाग, शासन आदेश क्र.मबाआ-२०१९/प्र.क्र.१८/कार्या-७ दिनांक ३१ मे, २०१९

शासन आदेश :-

उपरोक्त वाचा येथील शासन आदेशान्वये खालील अधिकाऱ्यांची सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली होती. तथापि, त्यांच्या विनंतीनुसार महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ कलम ४(४)(दोन) मधील तरतुदींनुसार सार्वजनिक सेवेच्या हितार्थ केलेल्या पदस्थापनेमध्ये (स्तंभ ३) अंशत: बदल करून विनंतीनुसार पुढीलप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिका-यांचे नाव	सध्याचे पद व कार्यालय	विनंतीनुसार पदस्थापनेनंतर नियुक्तीचे पद व कार्यालय
१	२	३	४
१.	श्री.एस.एम. खंडागळे	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, यवतमाळ	बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना), भिवंडी
२.	श्री.आर.डी.कुलकर्णी	बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना), चंद्रपूर	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड या पदावर १ वर्षाची मुदतवाढ
३.	श्रीम.एस.एच. जाधव	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जळगाव	बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना), उल्हासनगर
४.	श्रीम.एच.डी.देशमुख	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नांदेड	जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, औरंगाबाद

२. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे पदस्थापना देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३. वरीलप्रमाणे करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेच्या आदेशासोबत त्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक, तसेच अंतिम वेतन प्रमाणपत्र बदली करण्यात आलेल्या नवीन कार्यालयाकडे तात्काळ पाठविण्यात यावे.

४. वरीलप्रमाणे पदस्थापना करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने पदस्थापना झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत.

५. वरीलप्रमाणे पदस्थापना करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांना पदस्थापनाने देण्यात आलेल्या पदावर रुजू करुन घेताना, ते रजेवर / गैरहजर होते किंवा कसे याबाबतची खातरजमा त्यांना पदस्थापनेवर हजर करुन घेणाऱ्या कार्यालयाने करावी. सदर अधिकारी वैद्यकीय कारणास्तव गैरहजर असतील तर त्यांना हजर करुन घेण्यापूर्वी वैद्यकीय मंडळासमोर पाठवावे. जर अन्य रजेवर होते असे आढळल्यास त्यांचेकडून न चुकता तसा रजेचा अर्ज भरुन घ्यावा आणि नंतर हजर करुन घ्यावे. तसेच रजा संदर्भात शासनाने वेळोवेळी प्रसृत केलेल्या शासन निर्णय / परिपत्रकांतील निदेशांचे पालन करावे.

६. सदरहू बदली ही अंशत: बदल असल्याने उपरोक्त अधिकाऱ्यांना बदली विषयक प्रवासभत्ता व इतर अनुषंगिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१६२०४८३६५७३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.09.18 12:56:20 +05'30'

(ला.रा.गुजर)
शासनाचे सहसचिव.

प्रत,

१. आयुक्त,महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.
२. आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई.
३. विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, मुंबई /औरंगाबाद /अमरावती /पुणे/ नागपूर/ नाशिक
४. संबंधित अधिकारी,द्वारा- आयुक्त,महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.
५. मा मंत्री (म.व बा.वि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.राज्यमंत्री(म.व बा. वि.), यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
७. मा.सचिव(म.व बा.वि),यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,मुंबई-३२.
८. निवडनस्ती (कार्यासन-७) महिला व बाल विकास विभाग.